# श्वानांच्या सौंदर्यस्पर्धा

**आ**पल्याकडे बॉडी ब्यूटिफुल -शरीरसौष्ठव स्पर्धांमधून श्री ही पदवी दिली जाते. पूर्वी फक्त पुरुषांच्याच शरीर सौष्ठव स्पर्धा होत असत. आता सौदर्य प्रसाधने विकणारअया संपन्यांनी स्त्रियांच्या सौंदर्य स्पर्धा भरवायला सुरुवात केली आहे. आपल्याकडे शरीरसौष्ठवाच्या व कुस्तीगीरांच्या स्पधा वेगवेगळ्या असतातशरीरसौष्ठवात श्री तर कुस्तीच्या फडात कोसरी या पदव्य ाआहेत तशाच श्वान विश्वात देखील शरीसौष्ठवाच्या चॅंपियन व वैयक्तिक कुशलतेच्या ॲजिलिटी शो व सांघिक कार्यकुशलतेचा परफॉमिंग शो अशा तीन प्रकारच्या शोना जगभरात उधाण आलेले आहे. श्वान विश्वातील सर्वात जास्त पैसा या शो बिझिनेस- प्रदर्शन उद्योगात वाहताना दिसतो. नमुन्यादाखल आपण २०१० सालच्या सुरुवातीचे काही शोचे अर्थकारण पाहू.

निरनिराळ्या श्वान स्पर्धांची तुलना आपण ाणसांच्या स्पर्धांशी करू म्हणजे या तुलनात्मक अभ्यासाने आपल्याला त्यातील बारकावे लक्षात येतील. पुरुषांच्या श्री या शरीरसौष्ठव स्पर्धा, कराटे वा ज्युडोच्या स्पर्धा आणि आजकाल मॉडेल म्हणून काम करण्यासाठी केली जाणारी निवड यांचा आपण आधी विचार करू. श्री आणि केसरी या सर्वांना माहीत असलेल्या स्पर्धा. श्री स्पर्धेसाठी कमावलेले शरीर आणि केसरी पदासाठी कमावलेले शरीर खूपच वेगळे असते. मॉडेल होण्यासाठी लागणाऱ्या शरीराचा आपण स्वतंत्र व सर्वात आधी विचार करू.

मॉडेल म्हणून पुरुष स्वीकारले जाण्यास आत्ता आत्ता रेडीमेड कपडेवाल्यांनी सुरुवात केली. त्यामुळे मॉडेलच्या पुरुषांच्या स्पर्धा अजून भरविल्या जात नाहीत. पण सौदर्य व आकर्षकता हे स्त्रियांचे गुण असल्याने स्त्रियांसाठी ब्युटी क्वीनच्या स्पर्धा मात्र खूप आधीपासून चालत आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे बारकावे आपण पाहू. श्वानांच्या चॅंपियनशिपच्या प्रदर्शनाचे सूत्र या ब्यूटी क्वीनशी मिळते जुळते असते.

स्त्रीच्या सौंदर्यात सुडौलपणाला जितके महत्व असते, तितकेच महत्व तिच्या चेहऱ्यावरील हावभावाला असते. मोहकता हा शरीर व मनाचा एकत्रित परिपाक असतो. हालचालीतील सुसूत्रता, सहजता, व अधिकार यातून व्यक्तिमत्वाचे दर्शन होत असते. या ब्युटीक्वीन स्पर्धा म्हणजेच विश्वसुंदरी स्पर्धा वगैरे दूरचित्रवाणीमुळे आपण सामान्य माणसेही पाहू शकतो. या स्पर्धांतील सुंदरी या विशिष्ट शारीरिक मापांनी युक्त व विशिष्ट पोज देऊन डौलदारपण चालतात. थोडक्यात प्रमाणबद्ध शरीर, हवे तेथे गोलावे व कोन आणि चालण्यातला डौल पाहून झाल्यानंतर परीक्षक त्या स्पर्धकांची बौध्दक चाचणी घेण्यासाठी त्यांना प्रश्न विचारतात. त्यावेळी प्रश्नाचे उत्र देताना त्यांचा आवाज, त्यांचा आत्मविश्वास, त्यांची मनस्थिती दाखविणाऱ्या शरीराच्या लयबध्द हालचाली व चेहऱ्यावरचे भाव या निकषांवर शेवटी निवड केली जाते. लावण्य व सौंदर्य यातील फरक चोखंदळ वाचक जाणतात. श्वान स्पर्धांतील चॅंपियन तसेच सिगर स्पर्धांत धेखील या सर्व बाबी बघितल्या जातात.

चॅंपियन ही सिगरच्या खालची पायरी. सिगर परीक्षणात पास होण्यासाठी चॅंपियनचे सर्व गुण लागतातच, पण त्याच्याही पुढे जाऊन स्वतःसारखीच स्वतःची मुले निर्माण करण्याची दैवदत्त कुवत देखील लागते. सिगर-सिगरीन किताबाच्या स्पर्धेत अगदी चॅंपियनचे निकष लावले जातात आणि नंतर स्वतःसारखी मुले-मुली म्हणजे प्रजा निर्माण करण्याची कुवत बघितली जाते. कोणत्याही श्वान जातीच्या सिगर शोमध्ये पुढील प्रमाणे वर्ग करून त्यातून श्वानांना श्रेणी दिल्या जातात. प्रत्येक

वर्गामध्ये नर व माद्या असा स्वतंत्र विभाग असतात. विशेष म्हणजे नर व माद्यांचे परिक्षण करणारे परीक्षक वेगळे असतात. त्यामुळे प्रत्येक सिगर शोमध्ये दोन दोन परीक्षक असतात. एक प्रत्येक गटातील नर, तर दुसरा प्रत्येक गटातील माद्या पाहात असतो. या व्यवस्थेमुळे एक तर परीक्षकाला विश्रांती मिळते, दुसरे म्हणजे परीक्षकाच्या डोळ्यांसमोर एकाच लिंगाचे आकार  स्वरूप कायम डोळ्यासमोर असल्याने परीक्षण चांगले होते.

परीक्षणाच्या वर्गांमध्ये पहिला वर्ग असतो, बेबी. म्हणजे बालांचा. जी पिले दुसऱ्या घरी जायला तयार आहेत, ज्यांची वाढ सुरू झाली आहे व ज्यांनी व्यक्तिमत्व दाखवायला सुरुवात केली आहे, अशा श्वान पिलांच्या वयाची मर्यादा असते, सहा ते नऊ महिने. श्वान वाढीचा दुसरा टप्पा असतो तो नऊ ते १२ महिन्यांचा. या वर्गाला पपी म्हणजे पौगंडावस्थेतील श्वान असे म्हणता येईल. किशोर श्वानांची वयोमर्यादा असते १२ ते १८ महिन्यांची. या गटाला जूथ असे म्हणतात. त्यानंतरच्या १८ ते २४ महिने या वयोमर्यादेला यंग असे नाव दिलेले आहे. त्यानंतर श्वान प्रौढावस्थेत येतो. या वर्गाला ओपन असे नाव आहे. साईगर वा साईगरीन ही पदवी फक्त पोरौढांनाच दिली जाते. पोराटोरांना श्रीमान वा श्रीमती असे संबोधिले जाते का? इतर गटातील श्वानांना श्रेण्या मात्र दिल्या जातात. या श्रेण्यांतही क्रमवारी असते. खुल्या गटातील प्रौढ श्वानाला V म्हणजे उत्तम असा शेरा दिला जातो. त्यानंतर SG म्हणजे व्हेरी गुड, खूपच चांगले त्यानंतर G -गुड, चांगले. या खालोखाल A – सफिशंट किंवा पुरेसे व सर्वात शेवटी U म्हणजे इनसफीशंट - आवश्यक ते गुण नसलेला अशी वर्गवारी करून प्रत्येक श्वानाला प्रमाण पत्र दिले जाते. वयोगट, त्याचे नाव व प्रमाणपत्र याचा तक्ता पुढीलप्रमाणे-

या शो प्रकारात श्वान नरांनाच इतके महत्व का? प्रॉजिनी प्रकारात श्वान नरांना दोन माद्यांपासून झालेली पिलेच का? एका मादीला दोन नरांपासून झालेली पिले का नाहीत? हा पुरुष प्रधान संस्कृतीचा परिणाम आहे का?  असे प्रश्न तुमच्या मनात येणे शक्य आहे.

पिलांच्या उत्पत्तीत नर व मादी दोघांचाही सारखाच सहभाग आढळतो. पिलांच्यात त्यांच्या आई-वडिलांचे व त्यांच्या आई वडिलांचे गुण येत असतात. तरीही नराचीच पिलावळ तपासली जाते. याचे कारण तो एक तर त्याच्या आयुष्यातच नव्हे, तर तो मेल्यानंतरही पिले उत्पादन करतो. दुग्ध उत्पादनात पैदाशीसाठी वळू व गाय यांच्या बद्दल बोलताना म्हटले जाते की बुल इज हाफ द हर्ड म्हणजे तारजूमध्ये एका पारड्यात नर-वळू ठेवला तर त्याच्या सममूल्यासाठी दुसऱ्या पारड्यात कळपातील सर्व गायी ठेवाव्या लागतील. आता वीर्य गोठवून ठेवण्याची सोय असल्याने चांगला वळू मेल्यानंतरही त्याचे वीर्य खूप जास्त भावात लिलावात घेतले जाते. एक मादी तिच्या आयुष्यात जितकी पिले निर्माण करू शकते, त्यापेक्षा कितीतरी जास्त पिले एक नर उत्पादित करू शकतो. म्हणून पिले उत्पादनात नरांना माद्यांपेक्षा जास्त महत्व आहे.